# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ८७- २४** **दिनांक : - ०९/०३/२०२४**

**“ फेब्रुवारी ” महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.**

१) मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत येणा-या विरार, अर्नाळा, नालासोपारा परिसरात गेल्या काही महिण्यांपासुन रस्त्यावरुन वाहन चालवणा-या महीलांची, मोटारसायकलस्वार अज्ञात आरोपीत व्दारे मंगळसुत्र, सोन्याची चैन जबरीने खेचुन चेन स्नॅचींग प्रमाण वाढल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दि.२७/०१/२०२४ रोजी रात्रौ २२.०० वाजेच्या सुमारस फिर्यादी हया त्यांचे ॲक्टीव्हा स्कुटरने घरी जात असताना जुने विवा कॉलेजजवळ रिलायन्स मार्ट येथे अज्ञात आरोपीत यांने फिर्यादी याचे पाठीमागुन स्पोर्ट मोटारसायकल वरुन येवुन फिर्यादी यांचे गळयातील ९७,०००/- रु. किं.चे १७.४३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जु.वा.कि.सु. हे जबरीने खेचुन जकात नाका विरार प. बाजुकडे पळुन गेला म्हणुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७१/२०२४ भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे अनोळखी इसमा विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणे करीता मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे सदर गुन्हा उघडकीस आणणे करीता उक्त गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ कडे देण्यात आला. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष -३ चे वेगवेगळे पोलीस पथक तयार करुन आयुक्तालय परिसरात घडणारे चैन स्नॉचिंगचे विविध गुन्हयाचे अवलोकन करुन आरोपीत याने गुन्हयात वापरलेले वाहन तसेच आरोपीत याची गुन्हे करण्याची पध्दती वरुन गुप्त बातमीदार याचे मार्फतीने आरोपीत याची माहीती मिळवुन आरोपीत नामे - अमित नथु शनवार वय २८ वर्षे रा. तलासरी, ता. डहाणु, जि. पालघर यास गुन्हयात वापरलेली मोटारसायकल व हेल्मेट सह ताब्यात घेवुन त्याचे कडे कौशल्यपुर्वक तपास करता पोलीस कोठडी दरम्यान एक सोन्याची चैन व सोन्याची लगड असा ७३.७०० ग्रॅम वजनाचा ४,३८,२००/- रुपये किंमतीच्या मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन उक्त आरोपीत याचे कडे पोलीस कोठडी दरम्यान तपास करता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ७१/२०२४ | भा.द.वि.स. कलम ३९२ प्रमाणे |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २१/२०२४ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ३९४/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |
| ४ | नालासोपारा पोलीस ठाणे | ४१/२०२४ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |

आरोपीत यास दिनांक ०५/०२/२०२४ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर असुन गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे शाखा कक्ष -३ विरार हे करीत आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम - सायबर सेल यांचा दिनांक ०९/०३/२०२४ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



**मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना** गुन्हे शाखा कक्ष -३ चे पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख

२) आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं । ६५/२०२४ भादविस कलम ३७७, ३६३ सह पोस्को ४,६,८,१० प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी या दिनांक १३/०२/२०२४ रोजी सकाळी १२.१५ वाजता ते १२.३० वाजताचे सुमारास त्यांचे राहते घरी झोपलेले असताना त्यांची पिडीत मुलगी

वय ७ वर्षे ही तिचा चष्मा विसरल्याने तो घेण्यासाठी घरी आली असता पिवळा टी शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घातलेला, वय अंदाजे २५-३० वर्षे वयाचा अनोळखी आरोपी इसम हा बिल्डींगमध्ये आला. त्याने फिर्यादीच्या मुलीच्या हाताला पकडुन ती विरोध करीत असताना जबरदस्तीने त्याने तिच्या हाताला पकडुन बिल्डींगच्या टेरसवरती नेवून जबरदस्तीने पीडीत मुलीशी अनैसर्गीक संभोग केल्याबाबत फिर्यादी यांनी आचोळे पोलीस ठाण्यात दि.१३/०२/२०२४ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गंभीर गुन्हयाची बातमी प्राप्त होताच मा. वरीष्ठांच्या आदेश व सुचनांप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कार्यालयाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे यांचे मार्गदर्शनाखाली युनिट अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन गुन्हयाच्या घटनास्थळावरुन पळून जात असताना सी सी टी व्ही कॅमेरामध्ये चित्रीत झालेल्या आरोपीताच्या प्राप्त अस्पष्ट फोटोचे आधारे अनोळखी आरोपीताचा शोध चालू झाला. सदर आरोपीत हा घटनास्थळावरुन पळून गेल्यानंतर आजुबाजुचे परीसरातील सी सी टी व्ही कॅमे-याचे फुटेजचे आधारे व गोपणीय बातमीदारामार्फत शोध घेतला असता सदर आरोपीत हा नालासोपारा प. एस.टी. डेपो जवळील झोपडपटटीमध्ये व डोंबीवली ता. कल्याण येथे राहत असल्याची माहीती प्राप्त झाली. तात्काळ दोन्ही ठिकाणी पोलीस पथक पाठवुन आरोपीताचा त्या परीसरात शोध घेतला. तपासामध्ये आरोपीताचा मो.नं. प्राप्त करुन तांत्रिक विश्लेषनाव्दारे प्रवास करीत असलेल्या अजमेर एक्सप्रेस या ट्रेनचा अचुक अंदाज घेवून तपास पथक तात्काळ गुजरात बाजूकडे रवाना केले. सदर आरोपीत हा सुरत शहरात आल्याने सुरत सिटी क्राईम ब्रँच यांचे मदतीने आरोपीतास सुरत येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

<u>ताब्यात घेतलेल्या आरोपीत पुरुष इसमाचे वर्णन</u> :-

वय २८ वर्ष रा. सध्या रा. नालासोपारा एस टी डेपोचे बाजूची झोपडपट्टी, अक्षयबारचे समोर, नालासोपारा पश्चिम, तात्पु रा.- दिंडोरी, नवागाव सुरत शहर, मुळ गाव-देसुरी,ता.देसूरी जि-पाली, राज्य-राजस्थान

नमुद आरोपीताकडे अधिक चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन अशाप्रकारे सुमारे ४ ते ५ महीन्यापूर्वी ओसवाल नगरी बाबा संकुल नालासोपारा पूर्व येथे एक ७ ते ८ वर्षाच्या मुलीस खेचून बिल्डींगच्या आडोशाला नेवून तिच्यासोबत अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याच तपासात निष्पन्न झाले आहे. त्यानुसार तुळींज पोलीस ठाणे येथील गुन्हे अभिलेख तपासला असता सदर बाबत तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ७००/२०२३ भादविस कलम ३५४ सह पोस्को १२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**अटक आरोपीतांकडुन उघडकीस आलेले गुन्हे.**

| अं. नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | आचोळे | ६५/२०२४ भादविस कलम ३७७, ३६३ सह पोस्को ४,६,८,१० प्रमाणे |
| २ | तुळींज | ७००/२०२३ भादविस कलम ३५४ सह पोस्को १२ प्रमाणे |

**गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नमुदचा गुन्हा घडले पासुन अथक व अविरतपणे सलग परीश्रम करुन केवळ सी सी टी व्ही फुटेजमध्ये प्राप्त अस्पष्ट फोटोच्या आधारावर तसेच गोपनीय बातमीदारामार्फत आरोपीताचे नाव निष्पन्न करुन गुन्हा करुन रेल्वेने पळून जाणा-या आरोपीतास सुरत येथून ताब्यात घेवून गुन्हा घडल्यापासुन ४८ तासामध्ये गुन्हा उघडकीस आणला आहे.**

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री मधुकर पाण्डेय, मा. अपर पोलीस आयुक्त श्री श्रीकांत पाठक, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री अविनाश अंबुरे, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर प्रकाश शिंदे, सहा.फौज./रमेश भोसले, सहा.फौज/ संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पोहवा/ ०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./०५०३३ जगदीश गोवारी, पोहवा/०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पो.कॉ./ १२०९७ अमोल कोरे, मसुब/केकान, चौधरी सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, सहा.फौज- संतोष चव्हाण नेम- सायबर गुन्हे शाखा तसेच सुरत सिटी क्राईम ब्रँचचे पोउपनिरी/ प्रविण सिंह पडियार, सहाफौज/शैलेश दुबे, सहाफौज/ फरीद खान, पोहवा/मनोज पाटील, पोहवा/ रविभाई चव्हाण, पोहवा/सत्ता भाई, पोशि/ आशिष दिव्होरा, पोशि/ दिनेश रबाडी यांचा दिनांक ०९/०३/२०२४ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि श्री. शहुराज रणवरे

३) नवघर पोलीस ठाणे येथे दि.०५/०२/२०२४ रोजी प्रथम खबर देणार यांना दि.०५/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. चे सु. साधुराम हॉटेल, भाजीमार्केट जवळ, बी.पी. क्रॉस रोड, भाईदर पूर्व, ता.जि. ठाणे या ठिकाणा जवळील सार्वजनिक शौचालयामध्ये एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे- ३० ते ३५ वर्षे वयोगटातील अनोळखी पुरुष जातीचा इसम यास कोणीतरी अज्ञात इसमांनी जिवेठार मारण्याच्या उद्देशाने त्यास जबर दुखापत करुन मरणासन्न अवस्थेत टाकुन दिल्याचे पाहिले असता, त्यांनी समक्ष नवघर पोलीस ठाणे येथे हजर होवुन दिलेल्या खबरी वरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ९९/२०२४ भा.दं.वि.सं.कलम - ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाने गुन्हयाचा गतीमान पध्दतीने तपास सुरू करुन गुन्हयाचे घटनास्थळावरील तसेच घटनास्थळाचे आजुबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तसेच परिसरातील गुप्त बातमीदारांचे सहाय्याने व तांत्रिक विश्लेषणाचे मदतीने आरोपी यांचा शोध घेवुन गुन्हयात एकुण ०४ आरोपीत यांना नवघर पोलीस ठाण्याचे पोलीसांनी ६ तासाचे आत अटक करुन गुन्हा उघडकीस आनला आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.बजरंग देसाई, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, स.पो.नि. संदिप पालवे, सकुंडे, पो.उप.निरी. धनंजय गर्जेश, ज्ञानेश्वर आसबे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अं. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, मुकेश निकम, विनोद जाधव तसेच म.सु.ब.कुणाल हिवाळे यांचा दिनांक ०९/०३/२०२४ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.

**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. धिरज कोळी**

४) दिनांक ०३/०२/२०२४ रोजी रात्री २१.३० वा ते दिनांक ०४/०२/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा चे दरम्यान फिर्यादी यांनी त्याचे ताब्यातील ॲटो रिक्षा हि भाईंदर पश्चिम येथील राई पुला जवळ सार्वजनिक रस्त्यावर पार्क करुन घरी गेले असता अज्ञात इसमाने स्वताच्या फायदयाकरीता लबाडीच्या ईरादयाने चोरी केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०६/०२/२०२४ रोजी भाईंदर पोलीस ठाणेत अज्ञात इसमा विरुध्द गुरक्र. ६०/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे शाखा करत होती.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात दिवसेनदिवस वाहन चोरीचे प्रमाणात वाढ होत असल्याने अशा गुन्हयांना आळा घालणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सुचना देण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने वपोनिरी.संदिप कदम यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यानी घडणाऱ्या प्रत्येक वाहन चोरीच्या गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवुन आरोपीचा शोध घेत असताना पोहवा/शिवाजी पाटील यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम विरार पुर्व येथील रामु कम्पाऊन्ड, अंबा मदीराचे पाठीमागील बाजुच्या एका कोप-यात चोरीच्या रिक्षा व मोटार सायकल डम करुन त्याचे पार्ट वेगवेगळे करुन विक्री करत आहे. त्यानुसार सपोनि/दत्तात्रय सरक व पथक यांनी सदर ठिकाणी जावुन खात्री करुन सापळा रचला असता एक इसम रिक्षाची छेड छाड करीत असल्याचे दिसल्याने आश्रफ ऊर्फ सलमान मंहमद परवेज शेख, वय-३२ वर्षे, रा. रुम क्र.०६, गगनगिरी अपार्टमेन्ट, मकवाना कॉम्पेक्स, गोपचरपाडा, विरार पुर्व ता.वसई जि.पालघर यास शिफातीने ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याचे बाजुस उभ्या असलेल्या ९ रिक्षा व २ मोटर सायकल त्याने त्याचे साथीदार याचे सोबत चोरल्या असल्याचे सांगितल्याने त्याने चोरी केलेल्या ९ रिक्षा, २ मोटर सायकल व मोबाईल फोन असा एकुण ६,८८,५००/- रुपये किंमतीचा मुददेमाल त्याचेकडुन जप्त करण्यात आला असुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, मुंबई शहर आयुक्तालय, ठाणे शहर आयुक्तालय येथील खालीलप्रमाणे एकुण ११ चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

**:- उघडकीस आलेले गुन्हे :-**

| अ क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र व कलम |
|---|---|---|
| ०१ | भाईंदर पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ६०/२०२४ भा.द.वि कलम ३७९ |
| ०२ | दिंडोशी पोलीस स्टेशन, मुंबई शहर | गुन्हा रजि नं ८३५/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०३ | एमएचबी कॉलनी पोलीस स्टेशन, मुंबई शहर | गुन्हा रजि नं ४२२/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०४ | चारकोप पोलीस स्टेशन, मुंबई शहर | गुन्हा रजि नं २८०/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०५ | चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ०७/२०२४ भा.द.वि कलम ३७९ |
| ०६ | चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं २९४/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०७ | कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ४१४/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०८ | कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ३३३/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ०९ | कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ७४/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| १० | कापुरबावडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ३३९/२०२३ भा.द.वि कलम ३७९ |
| ११ | विरार पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं १२०१/२०२२ भा.द.वि कलम ३८० |

नमुद अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन तो खालील नमुद गुन्हयात तो पाहिजे आरोपी आहे.

| अ क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र व कलम |
|---|---|---|
| ०१ | नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं ८५/२०२४ भा.द.वि कलम ३७९, ३४ |

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे व.पो.नि. संदिप कदम, पो.नि. राहुल राख, सपोनि. दत्तात्रय सरक, सपोनि. नितीन बेंद्रे, पोउपनि. हितेंद्र विचारे, सपोउनि. श्रीमंत जेधे, पोहवा/०६०५६ शिवाजी पाटील, पोहवा/०७०३३ गोविंद केंद्रे, पोहवा/०७०६२ राजाराम काळे, पोहवा/०७१११ सतिश जगताप, पोहवा/९६०२६ आसिम मुल्ला, पोहवा/०८०२० महेश वेल्हे, पोहवा/०४००९ संग्राम गायकवाड, पोहवा/१२०१० अनिल नागरे, पोहवा/०७१६३ हनुमंत सुर्यवंशी, पोहवा/९६०५० मनोहर तावरे, पोहवा/०६०३० राजविर संधु तसेच स.फौ.संतोष चव्हाण नेम- सायबर सेल, मसुब जवान सचिन चौधरी यांचा दिनांक ०९/०३/२०२४ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक- ४ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस** आयुक्त **श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना मध्यवर्ती गुन्हे शाखेचे व.पो.नि. श्री. सदिप कदम** पो.नि. राहुल राख

४) मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात अंमली पदार्थाचे समुळ उच्चटन करणेकरिता मा. पोलीस आयुक्त सो. यांनी वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी आयुक्तालय कार्यक्षेत्रातील अंमली पदार्थ खरेदी विक्री करणारे इसमांवर कारवाई करणेबाबत

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.२१/०९/२०२३ रोजी १५:१५ वा. ते १५:३० वा.चे दरम्यान पंचामृत हॉटेल जवळ, बाजार वार्ड, विरार पुर्व येथे तक्रारदार श्री.नरेश दत्तु पाटील, वय-६२ वर्षे, रा.मु.फणसपाडा, पो.दहिसर, ता.वसई, जि.पालघर हे रोडचे कडने पायी चालत जात असतांना दोन अनोळखी इसमांपैकी एकाने फिर्यादी यांचे मनगटाला पकडुन 'काय मला ओळखत नाही का ?' असे बोलुन फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवुन गळयातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व पॅंटचे खिशातील पॉकेट काढुन त्यातील ४,०००/- रुपये रोख रक्कम असे हातचलाखीने काढुन घेऊन, फिर्यादी यांची फसवणुक करुन घेऊन गेले बाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ९०४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे दि.२१/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरा फुटेजची पडताळणी केली असता, त्यामध्ये सदरचा गुन्हा सराईत आरोपी-विजय तांबे याने केल्याचे निष्पन्न झाल्याने, नमुद आरोपीताचा तांत्रिक माहीती व गुप्त बातमीदारा मार्फत शोध घेत असतांना, गुन्हे प्रकटीकरण पथकास बातमीदाराद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे सराईत आरोपीत नामे.१)**विजय दत्ताराम तांबे, वय-५४ वर्षे**, रा.रोहीदास नगर शेलार गाव, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे, २)**अजय अशोक सावंत, वय-५० वर्षे**, रा.रुम नं.३०६, तिसरा माळा, बिल्डींग नं.२१, लल्लु भाई कंम्पाऊंड, गोवंडी, मानखुर्द, मुंबई सापळा रचुन ताब्यात घेवुन, सदर गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपीत यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता, त्यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | विरार | I ९०४/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-४२०,३४ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | शिवाजीनगर, ठाणे शहर | I ४६४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे |
| ३ | मध्यवर्ती, ठाणे शहर | I ६०५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम-४२०, ३४ प्रमाणे |
| ४ | चुनाभट्टी, मुंबई शहर | I २३०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे |
| ५ | कस्तुरबा सब, मुंबई शहर | I ४११/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी करणारे विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.ज्ञानेश फडतरे, पो.हवा.सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील,

संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं. संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ कार्यालयाचे पो.हवा. नामदेव ढोणे, व पो.अं.सोहेल शेख **"फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-२ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.

**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. राजेंद्र कांबळे**

६) विरार पोलीस स्टेशन गु रजि. क्र. ८६९/२०२३ भादविसंक ३९२,३४ प्रमाणे दाखल असुन गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन सुरु होता.मोबाईल फोन व गॅस बाटले चोरी करणारा एक इसम नालासोपारा पुर्व बिलाल पाडा येथे चोरीचे मोबाईल फोन व गॅस बाटले विक्री करात असल्याची माहीती मिळाल्याने सदर इसमांना सापळा रचुन त्यांना ताब्यात घेवुन त्याचे अंगझडतीमध्ये मोबाईल फोन व बाजुला गॅस बाटला मिळुन आला आरोपीकडे तपास केला असता त्याचेकडुन आयुक्तालयातील जबरी चोरीचे २ व चोरीचे ४ असे ६ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार राख,स.पो.नि. दत्ताञय सरक,, स.फौ. श्रीमंत जेधे, पो.हवा,मनोहर तावरे, राजविर संधु, संग्राम गायकवाड, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार, सतिष पवार, महेश वेल्हे,सतिष जगताप,राजविरसिंग संघु, अनिल नागरे, आसिफ मुल्ला, म.सु.ब. सचिन चौधरी तसेच सफौ चव्हाण नेम.सायबर सेल यांचा **"फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.

**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. राहुल राख**